/

सोलापूर महानगरपालिका,

जा.क्र.सआस/कक्ष.१/आस्था.१/१८४५
सामान्य प्रशासन विभाग
सोलापूर दि.१६/०१/२०२०

अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली सरळसेवची रिक्त पदे भरण्यासाठीची
विशेष भरती मोहिम-२०१९-२० अंतर्गत जाहिरात

शासन निर्णय दि.२१ डिसेंबर,२०१९ नुसार सोलापूर महानगरपालिका,सोलापूर अधिनस्त अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली गट-ब, गट-क व गट-ड मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची विशेष भरती मोहिम अंतर्गत खालील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी पात्रता धारण करीत असलेलया व अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सरळसेवा भरती प्रक्रिया संदभातील सविस्तर जाहिरात www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून, उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून पदनिहाय खालील नमूद केलेल्या पत्तयावर समक्ष सादर करावेत अथवा पाठवावेत.

अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक

| तपशील | दिनांक |
|---|---|
| अर्ज विक्री व स्विकृती | दि. १७/०१/२०२० पासून |
| संपूर्ण भरलेले अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक | दि. २७/०१/२०२० रोजी सायं.५.४५ पर्यंत |
| परिक्षा दिंनांक | दि.०९/०२/२०२० |

परिक्षा शुल्क

| परिक्षा शुल्क | रु.१५०/- |
|---|---|
| संकेतस्थळावरुन नमूना अर्ज भरुन पोस्टाने पाठविताना सोबत रु.१५०/- कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या आणि सोलापूर येथे देय असलेल्या रेखांकित धनाकर्षाध्दारे (डिमांड ड्राफ्ट), आयुक्त, सोलापूर महानगरपालिका,सोलापूर यांचे नांवे काढून अर्जासोबत जोडावा. व डी.डी.च्या मागे अर्जदाराने संपुर्ण नांव व पत्ता लिहावा. सदर शुल्क हे नापरतावा स्वरुपातचे राहील ते कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही. पोस्टाने पाठविणाऱ्या अर्जासोबत परीक्षा शुल्क डी.डी. स्वरुपात जोडले नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. समक्षतेत अर्ज सादर करणारे उमेदवारांकडून रोख रक्कम स्विकारणेत येईल. | |

परीक्षेच्या वेळापत्रकाचा तपशील www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. पोस्टाने/कुरियरने व अन्य यंत्रणेव्दारे पाठविलेल्या अर्जास झालेल्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. पोस्टाने/कुरियरने व अन्य यंत्रणेव्दारे पाठविलेल्या अर्जाच्या बंद पाकिटावर ठळक अक्षराने पदाचे नांव नमूद करण्यात यावे.

सोलापूर महानगरपालिका,सोलापूर अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी विशेष भरती मोहीम २०१९-२० अन्वये भरावयाच्या पदाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | एकूण पदसंख्या | अर्ज सादर करण्याचा पत्ता |
|---|---|---|---|
| १ | अवेक्षक (कनिष्ठ अभियंता) स्थापत्य | ३ | डॉ.व्दारकादास कोटणीस हॉल. निवडणूक कार्यालय,सोलापूर महानगरपालिका,सोलापूर, आय.सी.आय.सी.आय. बँकेच्या वर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक |
| २ | विज पर्यवेक्षक | १ | |
| ३ | शिक्षण सेवक | १ | |
| ४ | सहाय्यक आरेखक | १ | |

संगणक विभाग
आवक क्र. 1657
दि.:- 16/1/2020

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | सहाय्यक आरेखक | १ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक (पार्क चौक), रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१ फोन नं.०२१७-२७४०३२९ |
| ५ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ८ | |
| ६ | मिडवाईफ | २ | |
| ७ | अनुरेखक | १ | |
| ८ | वाहनचालक | २ | |
| ९ | शिपाई | ७ | |
| १० | मजूर | ३ | |
| ११ | माळी | २ | |
| १२ | लॅंप लायटर | १ | |

टीप :- भरती प्रक्रियेमधील एकूण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया/परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, परीक्षेचा प्रकार, समांतर आरक्षणात अंशत: बदल करणे तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त तथा अध्यक्ष, सेवकवर्ग निवड समिती,सोलापूर महानगरपालिका यांना राहिल.

आयुक्त तथा अध्यक्ष
सेवकवर्ग निवड समिती
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

**सोलापूर महानगरपालिके अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली गट ब, क, व ड सरळसेवा भरती २०१९-२० अन्वये भरावयाच्या पदांची नावे, रिक्त पद संख्या, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांचा एकत्रित तपशिल.**

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | एकुण भरावयाची पदे | समांतर आरक्षणा शिवाय | महिला | खेळाडु | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंश कालीन कर्मचारी | अनाथ | दिव्यांग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अवेक्षक (कनिष्ठ अभियंता) स्थापत्य | ३ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | विज पर्यवेक्षक | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | शिक्षण सेवक | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | सहाय्यक आरेखक | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ८ | ६ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | मिडवाईफ | २ | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | अनुरेखक | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | वाहनचालक | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | शिपाई | ७ | ५ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | मजूर | ३ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ | माळी | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२ | लॅम्प लायटर | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

टिप :- समांतर आरक्षणांतर्गत राखीव दर्शविलेल्या प्रवर्गाचे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

वरील कोष्टकात नमुद पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

परिशिष्ठ-अ

पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी (६वे वेतन आयोगानुसार) | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | अवेक्षक (कनिष्ठ अभियंता) स्थापत्य | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) समतुल्य पदावरील कामाच्या अनुभव धारकास प्राधान्य. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | विज पर्यवेक्षक | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची अथवा समतुल्य शाखेची पदविका व ०३ वर्षाचा कामाचा अनुभव **किंवा** विद्युत अभियांत्रिकी शाखेतील अथवा समतुल्य शाखेची पदवी. |
| ३ | शिक्षण सेवक | एकत्रित मानधन रु.६०००/- | मान्यताप्रापत मंडळाची किमान ५० टक्के गुणांसह उच्च माध्यमिक किंवा (समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची २ वर्षाची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो)<br>**किंवा** मान्यता प्राप्त मंडळाची किमान ५० टक्के गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि ४ वर्षाची प्राथमिक शिक्षणातील (B.El.Ed)<br>**किंवा** मान्यता प्रापत मंडळाची किमान ५० टक्के गुणांसह उच्च माध्यमिक किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण आणि दोन वर्षाची प्राथमिक शिक्षण शास्त्र पदविका (विशेष शिक्षण) परीक्षा उत्तीर्ण राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यता प्रापत संस्थेतून उत्तीर्ण .<br>**किंवा** राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतुदीनुसार मान्यता प्राप्त मंडळाची किमान ४५ टक्के गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची प्राथमिक शिक्षणशास्त्र दोन वर्षाची पदविका (D.T.Ed) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नांव असो)<br>**किंवा** मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा किमान ५० टक्के गुणांसह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यता प्राप्त संस्थेतून बी.एड.परीक्षा उत्तीर्ण .<br>(टिप- जे उमेदवार बी.एड.ही पात्रता पुर्ण करत असतील त्यांचा विचार नियुक्ती संदर्भात इ.१ली ते ५ वीच्या वर्ग अध्यापनासाठी शिक्षक म्हणून करण्यात येईल. तथापि, त्यांनी ६ महिन्याचा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परीषदेचा प्राथमिक शिक्षणशास्त्रातील अभ्यासक्रम Bridge course पुर्ण केलेला असणे बंधनकारक आहे)<br>**निवड :-** शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण केलेले व शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण तसेच अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षेमधील प्राप्त गुणांचा विचार करुन प्राप्त झालेल्या अर्जदारांची गुणवत्ता यादी तयार करुन गुणानुक्रमांच्या क्रमवारीनुसार जास्त गुण प्राप्त झालेल्या उमेदवाराची निवड करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | सहाय्यक आरेखक | ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० | अ) मान्यताप्राप्त कोणत्याही विद्यापिठाची पदवी परिक्षा उत्तीर्ण,<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण सिव्हील ड्राफ्समन अथवा तत्सम समतुल्य अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| ५ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | १)मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी परिक्षा उत्तीर्ण,<br>२)मराठी टंकलेखन किमान ३० शब्द प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखन किमान ४० शब्द प्र.मि. वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र आवश्यक. |
| ६ | मिडवाईफ | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्य. मंडळाची १२ वी विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका.<br>क)शासकीय / निमशासकीय खाजगी रुग्णालयातील परिचारिका म्हणून ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. |
| ७ | अनुरेखक | ५२००-२०२०० ग्रेड पे २०००? | अ) राज्य माध्यमिक/उच्च माध्यमिक मंडळाची शालांन्त परिक्षा उत्तीर्ण, आणि<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अनुरेखक (स्थापत्य) व तत्सम समतुल्य अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| ८ | वाहनचालक | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | अ) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) जड वाहन चालविण्याचा परवाना.<br>क) परवाना मिळाल्यानंतर वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>ड) मराठी लिहीता, बोलता व वाचता येणे आवश्यक.<br>ई) वाहन दुरुस्ती देखभालीचे कामासंबंधी प्रशिक्षणाचे मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्यास प्राधान्य.<br>फ) महापालिका सेवेतील गट-ड मधील कर्मचाऱ्यांना प्राधान्य. |
| ९ | शिपाई | ४४४०-७४४० ग्रेड पे १३०० | अ) इयत्ता ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक. |
| १० | मजूर | ४४४०-७४४० ग्रेड पे १३०० | अ) इयत्ता ४ थी उत्तीर्ण.<br>ब) मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक. |
| ११ | माळी | ४४४०-७४४० ग्रेड पे १३०० | इयत्ता ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण. व माळी व्यवसायाचा १ वर्षाचा कृषी विद्यापीठाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम पूर्ण. |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | लॅप लायटर | ४४४०-७४४० ग्रेड पे १३०० | अ) किमान ७ वी परिक्षा उत्तीर्ण<br>ब) वायरमन पदाचे ज्ञान आवश्यक |

**महत्वाची सुचना** :- मनपा धोरणानुसार आस्थापनेवरील वर्ग-अ ते ड मधील सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना मा.मनपा ठराव क्र.२५ दि.१३/०४/२०१५ नुसार नियुक्तीचे तारखेपासून प्रथमतः १(एक) वर्ष एकवट वेतन व तद्नंतर नियमित वेतनश्रेणी लागू राहील.

वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| 1) | संगणक अर्हता :- (पद क्रमांक्र.८ ते १२ वगळून) | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/2001/39 दिनांक 19.03.2003 मधील तरतुदी नुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस2015/प्र.क्र.277/39 दिनांक 4.2.2013 व शासन पुरकपत्र क्र. मातंस 2012/प्र.क्र.270/39 दिनांक 8.1.2018 मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता विहित मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक आहे.<br>**(शिक्षण सेवक या पदांकरीता सेवाप्रवेश नियमात नमुद प्रमाणे अर्ज करतांना वरील प्रमाणे संगणक अर्हता प्राप्त करणे बंधनकारक आहे.)** |
| 2) | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहीत उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील.<br>प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 व तद्नंतर जन्माला आलेल्या, अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. |

५) वरील सर्व पदांसाठी परीक्षेचे स्वरुप व दर्जा.

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | मराठी संबंधित प्रश्न | | इंग्रजी संबंधित प्रश्न | | सामान्य ज्ञान संबंधित प्रश्न | | बुध्दीमापन व गणित संबंधित प्रश्न | | तांत्रिक संबंधित प्रश्न | | एकूण | | प्रश्न पत्रिकेचा दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | |
| 1 | अवेक्षक (कनिष्ठ अभियंता) स्थापत्य | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | पदवी /पदवीका दर्जाची परिक्षा |
| 2 | विज पर्यवेक्षक | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | पदवीका दर्जाची परिक्षा |
| 3 | शिक्षण सेवक | लेखी परिक्षा घेण्यात येणार नाही. | | | | | | | | | | | | |
| 4 | सहाय्यक आरेखक | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | पदवी दर्जाची परिक्षा |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | कनिष्ठ श्रेणी लिपीक | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | पदवी दर्जाची परिक्षा |
| 6 | मिडवाईफ | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | एच.एस.सी. दर्जाची परीक्षा व आरोग्य सेवाविषयक प्रश्न |
| 7 | अनुरेखक | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | एच.एस.सी. दर्जाची परीक्षा व पदास अनुसरुन प्रश्न |
| 8 | वाहनचालक | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | एस.एस.सी. दर्जाची परीक्षा व पदास अनुसरुन प्रश्न |
| 9 | शिपाई | 20 | 40 | - | - | 20 | 40 | 10 | 20 | - | - | 50 | 100 | इयत्ता सातवी परीक्षे समान दर्जाची परिक्षा |
| 10 | मजूर | 20 | 40 | - | - | 20 | 40 | 10 | 20 | - | - | 50 | 100 | इयत्ता चौथी परीक्षे समान दर्जाची परिक्षा |
| 11 | माळी | 20 | 40 | - | - | 20 | 40 | 10 | 20 | - | - | 50 | 100 | इयत्ता सातवी दर्जाची व उदयान सेवा विषयक प्रश्न |
| 12 | लॅप लायटर | 10 | 20 | - | - | 10 | 20 | 10 | 20 | 20 | 40 | 50 | 100 | इयत्ता सातवी दर्जाची व पदास आवश्यक माहिती विषयक प्रश्न |

**(1) परीक्षेचा दर्जा / स्तर**

1. परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या त्या पदांच्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.

2. ज्या पदांकरिता पदवी ही कमीतकमी अर्हता आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या पश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता 12 वी) दर्जाच्या समान राहील.

**(2) परीक्षेव्दारे निवडीची कार्यपध्दती**

सदर विशेष भरतीतील गट-ब ,क व गट-ड संवर्गातील पदे भरतांना शासन निर्णय नुसार व खालील कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

1. गट ब व क मधील सर्व पदांकरीता उमेदवारांची निवड करतांना 200 गुणांची तर गट-ड मधील पदांकरिता 100 गुणांची परीक्षा घेण्यात येईल.

2. अशा परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे किमान 45 % गुण मिळविणाऱ्या उमेदवारांमधुन निवड सुची तयार करण्यात येईल.

**(3) निवड सुची व तीची कालमर्यादा**

निवड समितीने तयार केलेली निवडसूची 1 वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांका पर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

**(4) समान गुण असल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती**

साप्रवि शासन पूरकपत्र क्रमांक:प्रानिमं-1217/(प्र.क्रं.92/17)/13-अ दिनांक 02 डिसेंबर,2017 व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं1216/(प्र.क्रं.65/16)/13-अ दिनांक 13 जून,2018 अन्वये परिक्षेचा निकाल तयार करतांना परिक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

| |
|---|
| अ)आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| ब) वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| क) समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणीक अर्हता(पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल) |
| ड) वरील प्रमाणे दोन्ही अटी समान ठरत असल्यास उमेदवाराच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्येउच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |

**(5) सर्वसाधारण सुचना**

| सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
|---|---|
| अ) उमेदवार भारताचा नागरीक असावा | |
| ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा | डोमीसाईल प्रमाणपत्र आवश्यक |
| क) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं. मकसी1007/प्र.क्र.36/का.36 दिनांक 10 जुलै 2008 अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या 865 गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. | सदर उमेदवारांनी 865 गावांतील 15 वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुण्यातील दाखला कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे अनिवार्य राहिल. |

**(6) वयोमर्यादा**

I) उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरीता विहित वयोमर्यादा आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहिल.

II)अर्ज सादर करण्याचे अंतिम दिनांकास उमेदवारांचे वय 18 पेक्षा कमी नसावे.

III)अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकास उमेदवारांचे वय 43 वर्ष पेक्षा जास्त नसावे.

**ब) सामाजिक व समांतर आरक्षणानुसार विहित वयोमर्यादेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | आरक्षण/समांतर आरक्षण | शासन निर्णयानुसार आरक्षणाकरिता कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| 1 | मागासवर्गीय उमेदवार | 43 वर्षे व समांतर आरक्षणाकरीता शासन निर्णयानुसार |

| (7) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे (छायाकिंत व साक्षाकिंत प्रती.) | |
|---|---|
| 1 | उमेदवाराने त्यांच्या दाव्याच्या पृष्ठर्थ शैक्षणिक अर्हता , वयाचा पुरावा |
| 2 | जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र. |
| 3 | अधिवास प्रमाणपत्र (डोमीसाईल प्रमाणपत्र ) |
| 4 | अपंगाचा दाखला (असल्यास) |

| | |
|---|---|
| 5 | माजी सैनिक असलेबाबत प्रमाणपत्र (असल्यास) |
| 6 | प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त प्रमाणपत्र (असल्यास) |
| 7 | खेळाडू असलेबाबत प्रमाण्पत्र (असल्यास) |
| 8 | स्वांतत्र सैनिक नामनिर्देशन प्रमाणपत्र. (असल्यास) |
| 9 | अर्ज केलेल्या पदाप्रमाणे पदवीधर / पदवीकाधारक / शालांत माध्यमिक/ किमान इ.4 थी उत्तीर्ण प्रमाणपत्र व शाळेचा दाखला |
| 10 | अंशकालीन असलेबाबत प्रमाणपत्र , अनुभवाचे प्रमाणपत्र , नोंदणी प्रमाणपत्र. (असल्यास) |
| 8) | सर्वसाधारण सुचना - |
| 1. | मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास) या संबंधीची माहिती द्यावी लागेल. |
| 2. | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रते मध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्या प्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तसेच पदाच्या अर्हतेनुसार आवश्यक ती शैक्षणिक माहिती देणे आवश्यक आहे. तरच आपणास त्यापदासाठी अर्ज करता येईल. |
| 3. | उमेदवार एकाच अर्जामध्ये पात्र असलेल्या (जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक पात्रता, वयाची अर्हता आणि अन्य अर्हता विचारात घेवून) सर्व पदांना (इच्छूक असल्यास ) स्वंतत्र अर्ज करू शकतील व प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परीक्षा शुल्क आकारले जाईल. सदरचे परीक्षा शुल्क नापरतावा राहील. |
| 4. | उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| 5. | वरील सर्व पदासाठी गुणवत्ता यादी ही संपुर्ण राज्यातून प्राप्त होणा-या अर्जातून सोलापूर महानगरपालिकेसाठी तयार करणेत येईल. |
| 6. | उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो साक्षांकित लावावा तसेच अर्जावर योग्य त्या ठिकाणी सही करणे आवश्यक आहे अन्यथा, अर्ज अपात्र करणेत येईल. |
| (9) महत्वाच्या सूचना: | |
| 1) | 1)उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.<br>2) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थिती मध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही.<br>7) परीक्षेच्या वेळी उमेदवाराने खालील पैकी सध्याचे वैध फोटो ओळखपत्र पुरावा म्हणुन सोबत ठेवणे आवश्यक आहे.<br>(1) पॅनकार्ड, (2) पासपोर्ट, (3) वाहन अनुज्ञप्ती (4) मतदार ओळखपत्र<br>(5) फोटोसह राष्ट्रीयकृत बँकपासबुक (6) मूळ आधारकार्ड |
| 2) | उमेदवारास विभागीय परीक्षा तसेच हिंदी व मराठी परीक्षा तत्संबंधी नियमानुसार परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसल्यास त्याला/तिला परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल. |
| 3) | उमेदवारांना परिक्षेस तसेच मूळ कागदपत्रांच्या छाननीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही. |
| 4) | निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |
| 5) | निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात नमूद केलेली माहिती/अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे/उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास पदभरतीच्या कोणत्याही टप्यावर केलेली निवड/नेमणूक रद्द केली जाईल. |
| 6) | फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज संबंधित कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार |

| | |
|---|---|
| | नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. |
| 7) | निवडणूक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य काही कारणामुळे विहित दिवशी परीक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी परीक्षा घेतली जाईल. |
| 8) | अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. |
| 9) | उक्त जाहिरातीमध्ये घोषित केलेल्या पदांकरीता मुलाखती नसलेने प्रथम अंतरिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. मूळ कागदपत्रांची छाननी अंती व आक्षेप/हरकतींचा विचार करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. |
| 10) | **अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास संबंधित कार्यालयाकडे संपर्क साधावा.** |

| (11) विशेष सुचना | |
|---|---|
| 1. | महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनिया/1005/126 सेवा-4 दिनांक 31 ऑक्टोबर 2005 नुसार दि.01 नोव्हेंबर, 2005 रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना समाप्त करुन शासनाने नव्याने दिनांक 01.04.2015 पासून लागू केलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1974 आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. |
| 2. | महिला या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातुन पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार होवू शकेल. |
| 3. | निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकिय सोय विचारात घेऊन उपलब्ध असलेल्या रिक्त पदी प्रथम पदस्थापना देण्यात येईल. उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिकाऱ्यांवर दबाव आणल्यास त्यांचे नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल. |
| 4. | **लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र संबंधित कार्यालयाकडून विहित वेळेत समक्ष प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.** |
| 5. | सदर पदभरतीचे नियम/निकषामध्ये पदभरती पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या शासन निर्णय/परीपत्रक/अधिसुचना यानुसार बदल होवू शकतो. |
| (12) सामाजिक व समांतर आरक्षणाचे अनुषंगाने महत्वाच्या सुचना | |
| 1. | **महिला आरक्षण :-**<br>अ) महिला व बालकल्याण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक 82/2001/म.से.आ-2000/प्र.क्र. 415/ का.2, दि.25.05.2001 मधील तरतदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहील. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी तशी मागणी अर्जात करणे अनिवार्य आहे.<br>ब) महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महिला उमेदवारांनी महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक 82/ 2001/ मसेआ-2000/प्र.क्र.415/का.2, दिनांक 25.5.2011 तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक एसआरव्ही-1012/प्र.क्र.16//12/16-अ, दिनांक 13 ऑगस्ट 2014 आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| 2. | **माजी सैनिक :-**<br>शासन परिपत्रक साप्रवि क्र. आरटीए1079/482/16-अ दिनांक 16.04.1981 अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागु करण्यात आले आहे. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्या बाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्या बाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्तीदेण्यात येणार नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए 9090/62/प्र.क्र. 222/91/28 मुंबई दि. 30 डिसेंबर 1991 अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही. |

| | |
|---|---|
| | सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक 02.09.1983 नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त एका व्यक्तिला नियुक्ती देणेचे धोरण आहे व त्यांचा 15 टक्के समांतर आरक्षणातुन विचार करणेत येईल. |

(13) इतर सर्वसाधारण सुचना

| | |
|---|---|
| 1. | ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या अर्ज करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील अशा उमेदवारांना कोणत्याही कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही. |
| 2. | अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधीत सेवेत प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही. |
| 3. | शासकीय /निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. |
| 4. | अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे पात्रता परिक्षेस बसण्याचा/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. |
| 5. | निवड प्रक्रिया सुरू झाल्या नंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती बाद करण्यात येईल, व शासनाची दिशाभुल केल्या प्रकरणी सदर उमेदवारा विरूध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| 6. | चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती अक्षेपार्ह बाबी आढळून असल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहाणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील. |
| 7. | निवड झालेल्या उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इत्यादींची पुर्तता करून देणे आवश्यक राहील. तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पध्दतीनुसार करून घेणे बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती सेवाप्रवेशोत्तर परीक्षा/प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण/पुर्ण करणे आवश्यक राहील. |
| 8. | अपरिहार्य कारणास्तव किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्या प्रमाणे सोईच्या दिवशी परीक्षा घेण्यात येईल. याबाबतची माहिती संबंधित कार्यालयाकडून घेण्याची जबाबदारी ही संबंधित उमदेवाराची राहील. |
| 9. | लेखी परिक्षेस व कागदपत्र पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. |
| 10 | निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. वैद्यकीय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणुक रद्द करण्यात येईल. |
| 11. | वरील अटी व शर्ती नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहील. |
| 12 | जाहिराती मधील काही मुद्दे शासन निणर्याच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील. |
| 13. | शासन सामान्य प्रशासन विभाग पुरकपत्र क्र.प्रानिमं-2017/(प्र.क्र.92/17)/13-अ, दिनांक 5.10.2015 मधिल तरतुदी नुसार परीक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवरांचा गुणवत्ता यादीत समावेश करतांना आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य देण्याचा शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटूंबातील मृत शेतक-याचा पाल्य म्हणुन पात्र ठरविण्या बाबतचा पुरावा सांक्षाकित प्रतिसह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. |

(14). परीक्षेस प्रवेश

| | |
|---|---|
| 1. | लेखी परीक्षा व कागदपत्र पडताळणीसाठी येण्या-जाण्यासाठी येणारा खर्च उमेदवारास स्वत: करावा लागेल. |
| 2. | फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशपत्र, ओळखीचा मुळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशपत्रावरील सुचनेनुसार परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल. |

| | |
|---|---|
| 3. | डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भुत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड ब्ल्यू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तु इलेक्ट्रानिक उपकरणे, वह्या, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. |
| 4. | परवानगी नाकारलेल्या कोणत्याही प्रकारचे अनाधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशव्दारावरच ठेवावे लागेल. अशा साधन /साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. या संदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महाराष्ट्र शासन, जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद प्रशासन किंवा परीक्षा केंद्र व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही. |

## लेखी परीक्षेचे वेळापत्रक

| पदनाम | परीक्षेचा दिनांक | वेळ | तात्पुरती पात्र /अपात्र यादी जाहिर करणे | हरकती सादर करणेचा दिनांक | अंतीम पात्र/अपात्र यादी जाहिर करणे | उमेदवाराने हॉल तिकिट प्राप्त करून घेण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| अवेक्षक (कनिष्ठ अभियंता) स्थापत्य | 09.02.2020 | स.11.00 ते 12.30 | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |
| विज पर्यवेक्षक | 09.02.2020 | स.11.00 ते 12.30 | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |
| शिक्षण सेवक | 09.02.2020 | - | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |
| सहाय्यक आरेखक | 09.02.2020 | स.11.00 ते 12.30 | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |
| कनिष्ठ श्रेणी लिपीक | 09.02.2020 | स.11.00 ते 12.30 | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |
| मिडवाईफ | 09.02.2020 | स.11.00 ते 12.30 | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |
| अनुरेखक | 09.02.2020 | स.03.00 ते 04.30 | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |
| वाहनचालक | 09.02.2020 | स.03.00 ते 04.30 | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |
| शिपाई | 09.02.2020 | स.03.00 ते 04.30 | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |
| मजूर | 09.02.2020 | स.03.00 ते 04.30 | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |
| माळी | 09.02.2020 | स.03.00 ते 04.30 | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |
| लॅप लायटर | 09.02.2020 | स.03.00 ते 04.30 | 31.01.2020 | 03.02/2020 | 05.02.2020 | 07.02.2020 |

16/1/2020

उपायुक्त तथा सचिव
सेवकवर्ग निवड समिती
सोलापूर महानगरपालिका

आयुक्त तथा अध्यक्ष
सेवकवर्ग निवड समिती
सोलापूर महानगरपालिका

## सोलापूर महानगरपालिका सोलापूर

**अर्जाचा नमूना** अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक

| अलीकडील पासपोर्ट साईज फोटो लावून स्व.साक्षांकित करणे आवश्यक आहे. |
|---|
| |

प्रति,

मा.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

विषय: ---------------------------------------- पदासाठी अर्ज सन २०१९-२०२०
(विशेष सूचनाः अर्ज भरणेपूर्वी जाहिरातीमधील नमुद सर्व अटी व शर्तीचे काळजीपूर्वक वाचन करावे)

१) संपुर्ण नांवः स्वताचे नांव वडिलांचे/पतीचे/आईचे नांव आडनांव

------------------------- -------------------------- --------------------

२) Name of Applicant : (In Capital Letter) --------------- ------------------

------------------------------------------------------------------------------------

३) पत्रव्यवहारासाठी पत्ताः ----------------------------------------------------------

(पिन कोडसह) --------------------------------------------------------------

मोबाईल नंबर ---------------------------- ई-मेल आयडी ---------------------------

४) जातीचा प्रवर्ग :- अनुसूचित जमाती

५) समांतर आरक्षणाचा प्रकार:- (योग्य त्या ठिकाणी ( ) अशी खुण करावी) एका पेक्षा अधिक समांतर आरक्षणावर ( ) अशी खुण करावी.

| महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | खेळाडू | अंशकालीन | अनाथ | दिव्यांग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

६) परीक्षा शुल्क तपशीलः डी.डी.क्रमांक -------------------- दि.     /     /२०२० रुपये --------
बँकेचे नांव व शाखा ------------------------------------------------------------------

७) अर्जदाराची जन्म तारीख (अंकामध्ये) (शालांत प्रमाणपत्रा प्रमाणे)

| तारीख | महिना | वर्ष |
| --- | --- | --- |
| | | |

८) दिनांक २७/०१/२०२० रोजीचे वय

९) अर्जदार स्त्री आहे की पुरुष? (लागू नसेल ते खोडावे) स्त्री / पुरुष
१०) महिला उमेदवार महिला आरक्षणांचा लाभ घेणार आहे किंवा कसे? होय ( ) / नाही ( )
(योग्य ठिकाणी ( ) अशी खुण करावी)
११) अर्जदार महाराष्ट्राचा मुळ रहिवाशी आहे का? होय ( ) / नाही ( )
१२) अर्जदार विवाहित आहे काय? होय ( ) / नाही ( )
१३) अर्जदार स्वातंत्र्य सैनिकांचा पाल्य आहे काय? होय ( ) / नाही ( )
१४) अर्जदार सध्या सोलापूर महानगरपालिका सेवेत आहे काय? होय ( ) / नाही ( )
१५) महाराष्ट्र-कर्नाटक सिमावर्ती भागातील ८६५ गावातील रहिवासी आहे काय? होय ( ) / नाही ( )
(असल्यास १५ वर्षाच्या वास्तव्याचा सक्षम अधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला जोडावा)

१६) अ) जातीचे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांचा हुद्दा, प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक

---------------------------------------------------------------------------

ब) जात वैधता प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्यांचा हुद्दा, प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक

---------------------------------------------------------------------------

१७) अर्जदार जनगणना कर्मचारी आहे काय? (असल्यास साक्षांकित प्रत जोडावी)
१८) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय? होय ( ) / नाही ( )
१९) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता व व्यावसायिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचा तपशील)

| धारण केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा तपशिल | बोर्ड / विद्यापिठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

२०) शिक्षण सेवक पदाकरिता TET ------------------------- प्राप्त गुण व TAIT ---------------
प्राप्त गुण

२१) नांव नोंदणी केलेल्या सेवायोजन कार्यालयाचे नांव : -----------------------------------------

नोंदणी क्रमांक ---------------------------------- व दिनांक ---------------------------------

२२) उमेदवार दिव्यांग असल्यास लेखनिकाची आवश्यकता आहे काय? होय ( ) / नाही ( )

२३) पुर्वानुभव असल्यासः-

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव | पद | कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

२४) अर्जासोबत खालील छायांकित साक्षांकित प्रती जोडल्या आहेत.

१)
२)
३)
४)
५)
६)

वर नमुद केलेला तपशिल खरा आणि बरोबर आहे. --------------------------- या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी आणखीन असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमावण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

तसेच जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. लहान कुटुंबाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

ठिकाणः
दिनांकः / /२०२० अर्जदाराची सही

(अर्जदाराचे संपुर्ण नांव-------------------------------)

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाच्या नमुना-अ
प्रतिज्ञापत्र
(नियम ४ पहा)

मी श्री / श्रीमती ------------------------------------------------------------------

--------------- श्री-----------------------------------------------------------------------------

यांचा / यांची / मुलगा / मुलगी/ पत्नी वय------------------ वर्षे ----------------------राहणार-----

--------------------------------------------------------यांव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते/करतो की,

१) मी--------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ----------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च,२००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------- आहे.

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :- अर्जदाराची सही
दिनांक :- /०१/२०२० (अर्जदाराचे संपुर्ण नांव----------------------------)